PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 5

# ठाणे जिल्ह्यातील आदिवासींची स्थिती

**प्रा. गुरुनाथ मावंजी घुटे**
सहाय्यक प्राध्यापक
शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व
गोटीरामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय,
शिवळे, ता.मुरबाड, जि.ठाणे
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना:

मानवाला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी अन्न, वस्त्र व निवारा या मुलभुत तिन गरजांची पुर्तता करावी लागते या गरजा पुर्ण करण्यासाठी तो विशिष्ट क्रिया करतो. या क्रिया करतांना त्याला समाजातील इतर लोकांचे सहकार्य घ्यावे लागते. समाज ज्या भौगोलिक क्षेत्रात वास्तव्यकरतो तेथील मर्यादीत साधनात त्याला आपल्या जास्तीत जास्त गरजा पुर्ण करावयाच्या असतात हे करीत असतांना समाजाने स्वीकृत केलेला अर्थ गरजांच्या पूर्तीसाठी समाजाने मान्य केलेली आर्थिक क्रियांची व्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्था होय.

अश्मयुगापासून तर आजच्या औद्योगिक युगापर्यंत मानव कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या आर्थिक क्रिया करीत आला आहे. प्रत्येक युगात आर्थिक क्रियांचे स्वरुप एकसारखेच राहीले असे नाही. त्यांच्या आर्थिक क्रियांवर भौगोलिक परिस्थितीचा परिणाम होतो. दऱ्याखोऱ्यात राहणारे आदिवासी व शहरात राहणाऱ्या लोकांच्या आर्थिक क्रियांमध्ये फरक असणे स्वभाविकच आहे. आदिवासी लोकांचा जंगल, पशु, पक्षी, फळे, मुळे, वृक्ष, तलाव यांच्याशी संबंध येतो. साधने गोळा करण्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतात त्यांचे आर्थिक जीवन जास्त संघर्षमय आहे. पशुपालन, शेती, शिकार,

मासेमारी यासारख्या आर्थिक क्रियातुन ते निसर्गाशी संघर्ष करीत आपल्या गरजांची पूर्तता करतात.

**व्याख्या —**

माणवाच्या भौतीक गरजांची पूर्ती करण्यासाठी उत्पादनाचे संघटन, वितरणावर नियंत्रण तसेच समुदायातील मालकी आणि अधिकारांचे निर्धारण करण्यासाठी या पद्धतीला अर्थव्यवस्था म्हणतात — राल्फ पिडिग्टन□

डॉ.मुजमेदार आणि डॉ.मदन माणवी जीवनातील दैनंदिन महत्त्व गरजा या कमीत कमी प्रयत्नातुन भागविण्यासाठी माणवी संबंध आणि माणवाच्या प्रयत्नांना नियमित आणि संघटीत करणे म्हणजे अर्थव्यवस्था होय.

**अर्थव्यवस्थेचा अर्थ :**

अर्थव्यवस्थेचा गाभा म्हणजे माणवाची भूक माणवाला भूक लागली नसती तर त्याने श्रम केले नसते असे म्हटले जाते की, माणवाला पोट नसते तर तो आळशी झाला असता. आणि ही गोष्ट सत्य आहे. कारण भूक मिटवण्यावरच त्याचे अस्तित्व आहे. त्यासाठी त्याला आर्थिक क्रिया कराव्याच लागतात. त्याकरिता तो इतरांची मदत घेतो. लोक संघटनास होऊन ज्या आर्थिक क्रिया करतात त्या आधुनिक क्रियांच्या संघटनास अर्थव्यवस्था असे म्हणतात.

माणवाच्या आर्थिक क्रिया प्रत्येक युगात बदलत गेल्याचे दिसते. आद्यपाषण युगात खाद्य संकलन, शिकार आणि मासेमारी या आर्थिक क्रिया होत्या. नवपाषाण युगात पशुपालन व शेती या आर्थिक क्रिया झाल्या. तर धातु युगात अनेक लहान—मोठया उद्योगधंद्यांची भर पडली व नागरी अर्थव्यवस्थेला सुरुवात झाली. हे परिवर्तन होत असतांना एक माणवी गट अपरिवर्तनीय राहिला त्याची अर्थव्यवस्था

पाषणयुगातील माणवासारखीच राहिली ती अर्थव्यवस्था आपण आदिवासी अर्थव्यवस्था म्हणून ओळखतो.

भारतातील सर्व भागात आदिवासी आढळतात आणि भारताचे वातावरण सारखे नाही म्हणून भारतातील वेगवेगळया प्रदेशातील आदिवासींचे आर्थिक जीवन वेगवेगळे आहे. त्यातही महाराष्ट्रातील ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या आर्थिक जीवनावर दूरगामी परिणाम झालेला दिसतो. हा जिल्हा महाराष्ट्राची राजधानी मुंबई या शहराला लागून आहे. त्यामुळे या जिल्ळयातील आदिवासी औद्योगिक कामगार ते अन्न संकलन पर्यंत आर्थिक क्रिया करतांना दिसतो.

**ठाणे जिल्हयातील आदिवासींचे आर्थिक वर्गीकरण :**

**१) स्थायी शेती :**

ठाणे जिल्हयातील आदिवासी हे सद्य स्थितीत स्थायी शेती करतात. प्रदेशानुसार म्हणजे जव्हार, मोखाडा या भागात भात, नाचणी, उडीद, वरई ही पीके घेतली जातात. तर डोगराळ भाग वगळता वाडा, भिवंडी, शहापूर, वसई, डहाणू, विक्रमगड या भागात भाताचे पिक घेतले जाते आणि हे पिक मोठया प्रमाणात येते. साधारणत: कोकणा, वारली, महादेव कोळी, ठाकर या जमातींनी शेतीच्या विकासाकडे लक्ष पुरविल्याचे दिसते. पण डोंगराळ भागातील नापीक जमीन सिंचनाचा अभाव यामुळे शेतीतील उत्पादन उपजिवीके पुरतेच आहे तर काही प्रदेशात उपजिवीकाही भागवता येत नाही.

२) **अन्न संकलन :**

ठाणे जिल्हयातील आदिवासी ऋतुमाणानुसार अन्न संकलन करतात. साधारणत: जानेवारी महिन्यात मोहफुले संकलीन करतात शहापूर, मुरबाड, जव्हार या तालुक्यातील आदिवासी यामध्ये पुढे आहेत. ही फुले सुकवुन एक तर त्याची दारु तयार करतात किंवा बाजारात नेऊन त्याच्या बदल्यात कांदे, लसुन, बटाटे, साखर या वस्तु घेतात.

नंतरच्या उन्हाळयात डिंक, बीया (साग, काजू, राजन) गोळा करुन तालुक्याच्या आठवडा बाजारात विकुन आर्थिक क्रिया केल्या जातात यामध्ये वस्तु विनिमय पद्धतच असते. आदिवासी आपल्याकडील डिंक, बीया व्यापाऱ्याला देतात व व्यापारी त्यांना कांदे, बटाटे, साखर इ. वस्तु देतो. रानातील वस्तुंचे महत्त्व व व्यापाऱ्याकडील वस्तुची किंमत यांच्या प्रमाणानुसार हा व्यवहार होत असतो. यामध्ये आदिवासींची फसवणूक ही आलीच याचबरोबर तेलबिया, मध या गोष्टीही आदिवासी संकलीत करतात व आर्थिक क्रियांमध्ये सहभागी होतात पण आधुनिक पुढारलेला समाज त्यांची मोठी फसवणूक करतो.

३) **भटके :**

ठाणे जिल्हयातील आदिवासीमधील कातकरी ही जमात अजुनही भटके जीवन जगते. कारण या जमातीतील ९५: लोकांकडे जमीन नाही. त्यामुळे ते पावसाळयात शेतमजुर म्हणून राबतात तर उन्हाळयात वीटभट्टीच्या कामासाठी स्थळांतरीत होतात याचबरोबर शहापूर, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, मुरबाड या तालुक्यातील आदिवसी उन्हाळयामध्ये शहराकडे स्थळांतर करतात व तेथे मजुर म्हणून राबतात तसेच जव्हार, मोखाडा तुालक्यातील तरुणाई वसई, भिवंडी येथील रेती बंदरावर मजुरी करण्यासाठी स्थलांतर करतात.

४) **शिकार :**

ठाणे जिल्हयातील आदिवासी काही प्राणी व पक्षाची शिकार करुन त्यांचा अन्नामध्ये वापर करतात त्यासाठी ते पारंपारीक पद्धती व हत्यारांचा वापर करतात पक्ष्यांच्या शिकारीसाठी ते रबरापासून बनविलेल्या ‘गलोल’ चा वापर करतात तर काही पक्षांना पकडण्यासाठी फासांचा वापर करतात तसेच येथील आदिवासी मासेमारीही करतात ते नदी, तलाव, विहीर यामध्ये मासेमारी करतात. मासेमारीसाठी पारंपारीक साधनांचा वापर केला जातो. यामध्ये व्यापारी दृष्टीकोन नाही.

शासनाच्या धोरणाने शिकारीवर बंदी आणली आहे. त्यामुळे आता खुलेआम शिकार होताना दिसत नाही. कारण आदिवसी लोक कायद्याला खूप घाबरतात थोडयाफार्‍पमाणात लपून—छपून शिकार होते.

**५) पशुपालन :**

पशुपालन हे आदिमानवापासून चालत आलेली परंपरा आहे. आदिवासी लोक पशु—प्राण्यांना दैवत माणतात. प्शु असल्याने घराला घरपण येते अशी त्यांची समजुत आहे. ठाणे जिल्हयात पशुपालन गरजेनुसार पारंपारीक पद्धतीने केले जाते. शेतीत बैलाची गरज आहे. या बैलाच्या पैदासीसाठी ते गायींचे पालन करतात कारण बाजारातून बैल विकत घेणे आणि त्यांची निगा राखणे त्यांच्या आर्थिक कुवतीबाहेर असते. याच बरोबर काही आदिवासी म्हैस व रेडयांचा वारपही शेतीच्या कामासाठी करतात या शेतीच्या कामा बरोबर त्यांना शेण खतही मिळते.

गाई—म्हैशी पासून त्यांना दुधाची अपेक्षा नसते. दुधावर त्यांच्या वासराचा हक्क आहे असे ते माणतात. याचबरोबर पैसा मिळवण्यासाठी ते बकऱ्या व कोंबडयांचे पालन करतात. तसेच काही भागात आजही बकऱ्यांच्या मासांच्या बदल्यात शेतीची कामे करुन घेतली जातात. कुत्रा आणि मांजर हे प्राणीही ते पाळतात मांजर घरात असल्याने धान्यांची नासाडी करण्यासाठी उंदीर येत नाहीत असे त्यांचे मत आहे.

एकंदरीत या प्शुपालनातुन अर्थप्राप्ती हा त्यांचा उद्‌देश नसतो. तर आपल्या गरजांची पुर्तता करणे हा प्शुपालनाचा उद्‌देश आहे.

**४) औद्योगिक कामगार :**

ठाणे जिल्हयात हा मुंबई महानगराला लागुन असल्याने औद्योगिक वसाहती वसई, डहाणु, मुरबाड, भिवंडी कल्याण या भागात आहेत. या औद्योगिक कारखान्यात

बरेच आदिवासी तरुण कामगार/श्रमीक म्हणून राबताना दिसतात. शिक्षणाचा अभाव व अकुशलता यामुळे त्यांचे मोठे शोषण होते.

काही आदिवासींनी तर नगरामध्ये कायमचे वास्तव्य केले आहे. उदा. ठाणे शहरातील पातलीपाडा, नवापाडा या ठिकाणी वास्तव्य करणारे आदिवासी हे स्थलांतरीत औद्योगिक कामगार आहेत.अपुरे शिक्षण व शेतीतुन येणारे अल्प उत्पादन यामुळे ग्रामीण भागातील आदिवासी तरुण रोजगार मिळवण्यासाठी मोठया प्रमाणात स्थलांतर करतांना दिसतो. तो नागरी भागात येऊन औद्योगिक कामगार/श्रमीक म्हणुन राबतो.

**ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची वैशिष्टे :**

१) उत्पादन उपभोग व्यवस्था ठाणे जिल्हयातील आदिवासींची मुख्य समस्या म्हणजे उदरनिर्वाह त्यामुळे त्यांच्या सर्व आर्थिक क्रिया उदरनिर्वाहासी निगडीत आहेत. रानमेवा गोळा करणे, शिकार करणे मासेमारी , शेती या सर्व क्रियातुन मिळालेल्या वस्तुंचा ते उपभोग घेतात. त्यांच्या क्रियांच्या उद्देश व्यापार किंवा नफा हा नसतो. त्यामुहे ठाणे जिल्हयातील आदिवासींची अर्थव्यवसाि उपभोग प्रधान आहे.

**२) पैशाचा अभाव —**

ठाणे जिल्हयातील आदिवासी हे आपल्या कुटुंबाला आवश्यक असणाऱ्या वस्तुंचे उत्पादन घेतात. कधी—कधी कुटुंबाला आवश्यक असण्याइतकेही उत्पादन येत नाही त्यामुळे त्यांच्यात विनिमय होत नाही. कधी विनिमय झालाच तर तो वस्तुच्या स्वरुपात असतो. त्यामुळे पैशाचा वापर होत नाही. साहजीकच बॅका, पतसंस्था यांचाही अभाव जाणवतो. पैशाचा अभव हे त्यांच्या अर्थव्यवस्थेचे वैशिष्टय मानावे लागेल.

**३) सामुदाईक आधार :—**

सहकार्य हे आदिवासींच्या आर्थिक जिवनाचे प्रमुख अंग आहे. परस्पराबद्दल विश्वास , सहकार्य, बंधुभाव आणि जरमातीची कर्तव्य यामुळे आदिवासींच्या आर्थिक क्रिया परस्परांच्या सहकार्यावर चालतात. त्यांच्या आर्थिक क्रियांत नफ्याला गौन स्थान असते. ठाणे जिल्हयातील आदिवासी आजही शिकार, शेती, मासेमारी सामुदायीक पद्धतीने करतांना दिसतात. पण बदलत्या परिस्थितीत त्यांच्यातील सहाकर्य कमी होतांना दिसते. ही बाब दुर्लक्षीत करुन चालणार नाही.

**४) तांत्रीक साधनांचा अभाव :—**

ठाणे जिल्हयातील आदिवासी ज्या भूप्रदेशात राहतात तेथील नैसर्गिक साधनांचा वापर करुन आपल्या आर्थिक क्रिया पार पाडतात. फळे—कंदमुळे गोळा करणे, शिकार करणे, मासेमारी करणे या क्रियांतुन ते उदरनिर्वाह करणे हाच आहे. नॅा मिळवणे नव्हे त्यामुळे ते आधुनिक तांत्रीक ज्ञानापासून दूर आहेत ते आर्थिक क्रिया करतांना तांत्रीक साधनांचा वापर करत नाहीत हे त्यांच्या अर्थव्यवस्थेचे वैशिष्टय आहे.

**५) धर्म आणि जादुचा प्रभाव :—**

ठाणे जिल्ळयातील आदिवासींचे आर्थिक जिवन विषय कष्टदायक आहे. आदिवासींना आपला उदरनिर्वाह करतांना निसर्गांशी संघर्ष करावा लागतो. बऱ्याच वेळा त्यांच्या क्रियांना निसर्ग अनुकुल नसतो त्यामुहे ते हताश होतात व आपला उदरनिर्वाह योग्य पद्धतीने चालावा यासाठी अनेक धार्मिक विधी व जादु टोण्याचे संस्कार करतात. उदा. शेतीला सुरवात करण्याअगोद बियाण्यांची पुजा, लागवड कापणीसाठी पुजा, शिकारीला जाण्याअगोदर पुजा, मासेमारीला निघण्यापूर्वी पुजा इत्यादी याचबरोबर निषेधात्मक आज्ञांचे पालनही ते करतात. अशा प्रकारे आदिवासींच्या आर्थिक जिवनावर धर्म व जादुचा प्रभाव दिसुन येतो.

**निष्कर्ष :**

ठाणे जिल्हा हा केवळ किनारपट्टीला लागुन आहे. या जिल्हयातील आदिवासी डोंगराळ भागात वास्तव करतात. तेथील जमिन तिव्र उताराची व दगडाळ आहे. त्यामुळे त्यातुन येणारे उत्पादन अतिशय अल्प आहे. त्यामुळे उपजिवेकचा मोठा प्रश्न येथील आदिवासींचा आहे. त्यांच्या आर्थिक क्रियांमध्ये नफ्याला गौन स्थान असल्यामुळे त्यांच्याकडे पैसा नाही. विनिमय बऱ्याचदा वस्तुच्या स्वरुपत होतो. त्यांच्या अर्थव्यवस्थेचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे परस्पर सहाकार्य. परस्परावंर विश्वास असल्याने ते एकमेकांना मदत किंवा र्स्व मिळून एखादे काम करतात पण त्यांच्यातीलच काही सुशिक्षीत मंडळी त्याचा गैरफायदा घेतात.

आदिवासींमध्ये तांत्रीक ज्ञानाचा अभाव आहे. त्यामुळे उत्पादन अल्प आहे. उत्पादन वाढवायचे असेल तर तांत्रीक ज्ञ्ज्ञनाचा स्वीकार करणे गरजेचे आहे. पण त्यासाठी निरक्षरता हा सुद्धा मोठा प्रश्न आहे. अशिक्षित समाज धर्म व जादूच्या प्रभावाखाली आला आहे. त्यामुळे आपल्या समस्या सोडविण्यासाठी अनेक प्रकारचे धार्मीक विधी व जादूचे संस्कार करतो काही भागात तर प्रत्येक घरी विशिष्टय विधी प्रत्येक वर्षी झालाच पाहिजे असा दंडक लोकांनी स्वत:वर घालुन घेतला आहे. या विधीसाठी किंवा संस्कारासाठी केला जाणारा खर्च आदिवासींच्या आवाक्याबाहेरचा असतो. त्यांच्या विधीमध्ये दारु व मांसाहाराला मोठे स्थान आहे. दु:ख व आनंद दोन्ही गोष्टींमध्ये दारुला महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन बनून समाजव्यवस्था विकोपाला गेली आहे. परिणामी अर्थव्यवस्था खिळखिळी झाली आहे.

महाराष्ट्र सरकार किंवा भारत सरकार अनेक योजना राबवित आहे पण त्याचा प्रभाव पाहिजे तेवढा पडला आहे असे म्हणता येणार नाही. समाजातील पुढारी किंवा एखाद्या विशिष्टय गटाने त्याचा फायदा उचलला आहे. ठाणे जिल्हयातील आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सगळयात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी स्वत:ची मानसीकता बदलने गरजेचे आहे. सुशिक्षीत होवुन परिर्वतन घडवुन आणने गरजेचे आहे.

ठाणे जिल्हयातील काही भागातील शेतकऱ्यांनी अत्याधुनिक फुलशेतीला सुरवात केली आहे. मुंबई मधील 'दादर' मार्केटला मोठया प्रमाणात 'मोगरा' ठाणे जिल्हयातील ग्रामीण भगातुन येतो तसेच वाशी मार्केटला मुरबाडची भ्झेंडी प्रसिद्ध आहे. एकंदरीत आदिवासी अर्थव्यवस्था परिवर्तनीय होत आहे. ही बाब सुद्धा महत्वाची आहे पण अजुन परिवर्तन होवुन गतिशिल होणे गरजेचे आहे.

## संदर्भः

१) आदिवासी विश्व –डॉ.सौ.शैलजा देवगांवकर, डॉ.श.ग. देवगांवकर – आनंद प्रकाशन, नागपूर.

२) महाराष्ट्रातील आदिवासी – डॉ.शौनक कुलकर्णी – डायमंड पब्लीकेशन, पुणे.

३) आदिवासींचे समाजशास्त्र – डॉ.माणिक माने,डॉ. ए.ए.गढवाल – विद्या प्रकाशन.

४) समता संघर्ष – मार्गदर्शिका – डॉ.बी.एस. क्षिरसागर – विद्या प्रकाशन.

५) भारतीय समाज संरचना आणि समस्या – डॉ.प्रदिप आगलावे – श्री साईनाथ प्रकाशन.